**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, AUG-SEPT 2018, VOL- 6/29*

# मराठी माध्यमाच्या इ.पाचवीच्या विद्यार्थ्यांमध्ये आकलनात्मक पातळीवर विकसित झालेल्या मराठी भाषेतील शब्दसंपत्तीचे विश्लेषण करून त्यांचा तुलनात्मक अभ्यास

**अतुल कुलकर्णी, Ph. D.**

*विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे ४*

*E – Mail - atulkulkarni13@gmail.com*

**Abstract**

*भाषण, वाचन व लेखन या क्षमता जर व्यवस्थित विकसित व्हायच्या असतील तर नुसते शब्दसंपत्तीचे ज्ञान असून चालणार नाही. म्हणजेच ज्ञात झालेल्या शब्दांचे आकलन झाले पाहिजे. शब्दांचे आकलन जन नीट झाले तरच योग्य शब्द निवडता येतील, त्यांचा वापर करता येईल. आपले विचार समोरच्यांपर्यंत थोडक्यात पण स्पष्टपणे पोहचविता येतील. भावना व्यक्त करता येतील, समोरच्यांच्या भावना समजून घेता येतील. परिस्थितीनुरूपअनेक समानार्थी शब्दांपैकी नेमका कोणत्या शब्दाचा वापर करावा हे समजेल.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

- **प्रास्ताविक :—**

श्रवण, भाषण, वाचन व लेखन या भाषच्या मुळ क्षमता होत. जर व्यक्तिजवळ शब्दसंपत्ती असेल तरच या क्षमता विकसित होऊ शकतात. भाषण, वाचन व लेखन या क्षमता जर व्यवस्थित विकसित व्हायच्या असतील तर नुसते शब्दसंपत्तीचे ज्ञान असून चालणार नाही. त्याकरिता श्रवण कलेली शब्दसंपत्ती, ज्ञात असलेली शब्दसंपत्तीचे आकलन होणे, अर्थ समजणे खूप आवश्यक आहे. नाहीतर नुसती शब्दसंपत्ती भरपूर आहे पण तिचे आकलनच झालेले नसेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. आकलनाशिवाय त्याचा उपयोगही करता येणार नाही. उदा. व्यक्तिला समानार्थी शब्द माहिती आहेत. पण त्या शब्दांचे आकलन नीट झालेले नसेल तर नेमका कोणता शब्द येथे वापरावयाचा हे कळणार नाही. नुसते साधे शब्दच वापरत गेले तर भाषेचे सौंदर्य खुलून दिसणार नाही. त्यामुळे शब्दसंपत्तीचे आकलन होणे खूप आवश्यक आहे.

- **संशोधनाची गरज :—**

शब्दसंपत्तीवर पभूत्त्व ही एक स्वतंत्र क्षमता आहे. विद्यार्थी शब्दांचा वापर करताना त्याच त्या तसेच साधे व मोजकेच शब्द वापरतात, नाविन्यता नसते, म्हणी, वाक्प्रचार यांचा उपयोग न करता अगदी साधे वाक्य लिहिण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. शब्दसंपदा संकलित करण्याच्या बाबतीत जर विद्यार्थी असाच उदासीन राहिला तर शब्दसंपत्तीच्या अभावामुळे विद्यार्थी स्वत:च्या विचारांना योग्य न्याय देऊ शकरणार नाही. म्हणून ज्ञानात्मक पातळीवर ही शब्दसंपत्ती किती प्रमाणात आहे हे तपासण्यासाठी अभ्यास करण्यात आला.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **न्यादर्श :—**

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील शहरी भागातून ११००, ग्रामीण भागातून २००० व आदिवासी भागातून २०० विद्यार्थ्यांची सूगम यादृच्छिक लॉटरी पध्दतीच्या सहाय्याने न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

- **संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्व्हक्षण पध्दतीतील संपादन परीक्षण पध्दतीचा उपयोग केला गेला.

- **संशोधन साधन :—**

प्रस्तुत संशोधनासाठी संपादन चाचणी तयार करण्यात आली. त्या चाचणीच्या सहाय्यानेमाहिती एकत्रित केली गेली. या चाचणीमध्ये ज्ञानात्मक, आकलनात्मक व उपयोजनात्मक पातळीवरील प्रश्न विचारण्यात आले होते.

- **संशोधनाची कार्यपद्धती :—**

तीन भागातील विद्यार्थ्यांच्या शब्दसंदपत्तीचा ज्ञानात्मक, आकलनात्मक व उपयोजनात्मक अशा तीन उद्दिष्टांच्या संदर्भात करण्यात आला. तसेच या तीनही विभागात व तीनही उद्दिष्टांच्या स्तरावर मुले व मुली यांच्या संपादनाची तुलना करण्यात आली व निष्कर्ष काढण्यात आले.

- **शब्दसंपत्तीचे मापन :—**


प्रस्तुत अभ्यासामध्ये आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन तपासण्यासाठी चाचणीमध्ये शब्दांचा अर्थ लिहा, शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा, दिलेल्या वाक्यात कंसातील सर्वनामे योजा, दिलेल्या वाक्यात कंसातील क्रियापदाचे रूप योजा यांचा अंतर्भाव केला होता. या प्रकारे एकूण ४ प्रश्न विचारले होते. त्यात प्रत्येकी एकूण दहा उपप्रश्न होते. त्यांना प्रत्यकी एक गुण याप्रमाणे प्रत्येक प्रश्नाला एकूण दहा गुण होते. या प्रश्नांना ग्रामीण भागातील १६००, शहरी भागातील ८१८ व आदिवासी भागातील २०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

- **विभागवार विश्लेषण :—**

शहर ग्रामीण व आदिवासी भागातील मुले व मुली यांच्यामध्ये संपादन चाचणीने मोजलेल्या आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे विभागवार विश्लेषण पुढील प्रमाणे—

**आकलनात्मक पातळी— विकसित शब्दसंपत्ती — विभागवार विश्लेषण**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| ग्रामीण | ४७.२८ |
| शहरी | ३४.४० |
| आदिवासी | १६.९० |




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,


१. शहरी — ग्रामीण, शहरी —आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीच्या संपादनात फरक आहे.

२. आलेखारून असे दिसते की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आलेख शहरी व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाच्या पूर्णत: उजवीकडे आहे. याचा अर्थ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती शहरी व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा चांगली आहे.

३. आदिवासी विभागाचा आलेख मात्र शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे आहे याचा अर्थ शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांच्यापेक्षा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन कमी आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुले आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुले | ४६.९३ |
| शहरी भागातील मुले | २२.५० |
| आदिवासी भागातील मुले | १७.५० |



वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. शहरी — ग्रामीण, शहरी —आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील मुलांच्या आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीच्या संपादनात फरक आहे.

२. ग्रामीण भागातील मुलांचा आलेख शहरी भागातील मुलांच्या आलेखाच्या उजवीकडे पूर्णत: दूर गेलेला दिसतो. याचा अर्थ ग्रामीण भागातील मुलांची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती शहरी भागातील मुलांच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा चांगली आहे.


३. शहरी भागातील मुलांच्या आलेखाचा खालील ३०टक्के भाग आदिवांसी भागातील मुलांच्या आलेखाच्या डावीकडे आहे. याचा अर्थ शहरीभागातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलांच्या आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती आदिवासी भागातील मुलांच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे. मात्र शहरी भागातील मुलांच्या आलेखाचा वरील ७० टक्के भाग आदिवासी भागातील मुलांच्या आलेखाच्या उजवीकडे आहे. याचा अर्थ शहरीभागातील सर्वसामान्यापेक्षा वरच्या गटातील मुलांची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती आदिवासी मुलांच्यापेक्षा चांगली आहे.

४. आदिवासी विभागाचा आलेख मात्र ग्रामीण भागातील मुलांच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे आहे. याचा अर्थ ग्रामीण भागातील मुलांच्यापेक्षा आदिवासी भागातील मुलांची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती कमी आहे.

म्हणजेच ग्रामीण भागातील मुलांची आकलन पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती शहरी आणि आदिवासी मुलांपेक्षा जास्त आहे. शहरी भागातील मुलांची विकसित शब्दसंपत्ती आदिवासी भागातील मुलांपेक्षा जास्त आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुली आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुली | ४६.६५ |
| शहरी भागातील मुली | ४७.४३ |
| आदिवासी भागातील मुली | १५.०० |



वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,


१. शहरी – ग्रामीण, शहरी –आदिवासी भागातील व ग्रामीण–आदिवासी भागातील मुलींच्या आकलनात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीमध्ये फरक आहे.

२. मुलींच्या आलेखावरून असे दिसते की, शहरी भागातील मुलींच्या आलेखाचा खालील ३० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलींच्या आलेखाच्या उजवीकडे आहे. याचा अर्थ शहरी भगातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलींची विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलींच्या विकसित  शब्दसंपत्तीपेक्षा चांगली आहे. मात्र शहरी भागातील मुलींच्या आलेखाचा ७० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलींच्या आलेखाच्या डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी भागातील सर्वसामान्यापेक्षा वरच्या गटातील मुलींची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण मुलींच्या शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे.

३. आदिवासी भागाचा आलेख मात्र शहरी भागातील व ग्रामीण भागातील मुलींच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी भागातील व ग्रामीण भागातील मुलींच्यापेक्षा आदिवासी भागातील मुलींची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती कमी आहे.

**शहरी भागातील मुले–मुली आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| शहरी भागातील मुले | २२.५० |
| शहरी भागातील मुली | ४७.४३ |




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,


१. शहर विभागाच्या आलेखावरून असे दिसते की, मुलांचा आलेख मुलींच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे असलेला दिसून येतो. याचा अर्थ शहरी भागातील मुलांची आकलनात्मक

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती मुलींच्या आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे.

**ग्रामीण भागातील मुले—मुली आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुले | ४६.९३ |
| ग्रामीण भागातील मुली | ४६.६५ |





वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. मुलांच्या आलेखाचा खालील ३० टक्के भाग मुलींच्या आलेखाच्या थोडासा उजवीकडे असलेला दिसून येतो. याचा अर्थ ग्रामीण भागातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलांची आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ही मुलींच्या सर्वसामान्यपेक्षा खालच्या गटातील आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीपेक्षा थोडी जास्त विकसित आहे. मात्र ७० टक्क्यांच्या वरील आलेखाच्या निरीक्षणावरून वरच्या पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीमध्ये ग्रामीण भागातील मुले व मुली यांच्यात काहीही फरक नाही.

**आदिवासी भागातील मुले—मुली आकलनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| आदिवासी भागातील मुले | १७.५० |
| आदिवासी भागातील मुली | १५.०० |




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

मुलांचा आलेख डाव्या बाजूला आहे. याचाच अर्थ आदिवासी भागातील मुलांची आकलन पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती मुलींपेक्षा जास्त आहे.

संदर्भ :—

*National Council of Educational research & Training Report of the Minimum Learning Committee, Department of Education, New Delhi*

*Shrivastava,R,P, (2005) Reading Ability & School Achievement, Delhi, Commonwelth Publication*

*Dandekar,W,N, (1984), Evaluation in Schools, Pune, Shri Vidya Prakashan*

*शब्दसंपत्ती वारंवारिता सारणी (२००४), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे*

*सोहनी चित्रा, (२००५), भाषिक कौशल्यांचा विकास, पुणे, नित्यनूतन प्रकाशन*

*मराठी बालभारती, इयत्ता पहिली ते पाचवी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे*

*कदम, चा.प. (२००५), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे नूतन प्रकाशन*

*देशपांडे वा.सू. (१९९१) उद्दिष्ट पूर्तीसाठी भाषा शिक्षण, पुणे, महाराष्ट्र अध्यापक*

*मराठीचा भाषिक वापर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रमुक्त विद्यापीठ, नासिक*